**विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई**

**सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या विशेषत: विधि व न्याय विभागातील कामकाजाचा तसेच सेवाप्रवेश नियमाच्या कामकाजाचा अनुभव असलेल्या सहायक कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची एक वर्षाकरीता विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे. अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ https://lj.maharashtra.gov.in वर उलपब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती पाहून अर्ज करावेत. अर्ज जाहिरातीच्या दिनांकापासून १० दिवसांत सादर करावा.

(सं.द.खेडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन
०२२-२२७९३६१०

E:\Nagle\करार पद्धतीने नियुक्ती\लघुलेखक स.क.अ. करार पद्धतीने नियुक्ती\जाहीरात व आदेश.odt/19

<u>संकेतस्थळावरील माहिती</u>

**विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई**
**सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

**<u>विभागाची आवश्यकता</u> :**

मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या विशेषत: विधि व न्याय विभागातील कामकाजाचा तसेच सेवाप्रवेश नियमाच्या कामकाजाचा अनुभव असलेल्या सहायक कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची खालील नमूद तक्त्यानुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

| संवर्ग | कामाचे स्वरूप | भरावयाची पदे |
|---|---|---|
| सहायक कक्ष अधिकारी | विधि व न्याय विभागातील सेवा प्रवेश नियम सुधारित करण्याच्या विवक्षित कामासाठी | १ |

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येत आहे.

२) मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सहायक कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेला कर्मचारी असावा. सेवानिवृत्त कर्मचारी शारिरीक , मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा,तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) उमेदवारास सहायक कक्ष अधिकारी या पदावरील किमान ३ ते ५ वर्षाचा अनुभव असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्हयात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने सदर पदाकरिता सोबत जोडलेल्या कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहून अथवा टंकलेखित करुन सादर करावा.

८) उमेदवाराने त्यांचे अर्ज सदर पदाकरिता वेबसाईट वरील माहिती पाहून <u>https://lj.maharashtra.gov.in</u> या मेल आयडीवर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या

आत करावेत. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबत संपुर्ण अधिकार विभागाचा राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

---------x-------

## अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव :-..........................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-..........................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-..........................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-..........................................................................

५) जन्म दिनांक व वय :-..........................................................................

६) विभागास आवश्यक अर्हता :-..........................................................................

७) अनुभव :-..........................................................................

..........................................................................

८) विधि व न्याय विभागाच्या संकेतस्थळावर दि.______________________________ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जाहिरातीतील / सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी